DMn-8

100

मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बंधपत्रित उमेदवारांची बंधपत्रित सेवेत नियुक्ती करण्यासाठी दोन राज्यस्तरीय मध्यवर्ती समित्या गठीत करणे व योग्य ती कार्यपध्दती निश्चित करणेबाबत ..

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग**
शासन निर्णय क्रमांक : डब्ल्युपीएम २०११/प्र.क्र.३५२/११/शिक्षण-२
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ०४ एप्रिल, २०१२

वाचा :

i. मा. मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक १४४०/२०११, रिट याचिका (लॉजिंग) क्रमांक १६१९/२०११, १६३९/२०११, १८३४/२०११ व १८३५/२०११ या प्रकरणी दिनांक २०/१०/२०११ रोजी दिलेला अंतरिम आदेश.
ii. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक संवैशिवस/ बंधपत्र/ या.क्र.१४४० /२०११ /उन्या /मध्यवर्तीसमिती /८-अ, दिनांक १८/११/२०११
iii. शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, क्रमांक एमईडी १००७/प्र.क्र.४९०/०७/शिक्षण-२, दिनांक ०८.०२.२००८
iv. शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, क्रमांक एमईडी १००६/प्र.क्र.०५/०६/शिक्षण-२, दिनांक ३१.०७.२००६

प्रस्तावना

मा. मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक १४४०/२०११ (डॉ. कबीर उमाकुमार व इतर विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर), रिट याचिका (लॉजिंग) क्रमांक १६१९/२०११, १६३९/२०११, १८३४/२०११ व १८३५/२०११ या प्रकरणी दिनांक २०/१०/२०११ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार, राज्यातील शासकीय व महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांमधून पदवी, पदव्युत्तर व अतिविशेषोपचार अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या बंधपत्रित उमेदवारांची बंधपत्रित सेवेत नियुक्ती करण्यासाठी दोन राज्यस्तरीय मध्यवर्ती समित्या गठीत करण्याचा व सुयोग्य कार्यपध्दती निश्चित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय

मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशानुसार राज्यातील शासकीय व महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांमधून पदवी, पदव्युत्तर व अतिविशेषोपचार अभ्यासक्रम

पूर्ण केलेल्या [illegible]त्रत उमेदवारांची बंधपत्रित सेवेत [illegible]क्ती करण्यासाठी याव्दारे खालील [illegible]
राज्यस्तरीय मध्यवर्ती समित्या गठीत करण्यात येत आहेत.

(अ) वैद्यकीय अतिविशेषोपचार व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांना बंधपत्रित सेवेत नियुक्ती देण्याकरीता मध्यवर्ती समिती

| | | |
|---|---|---|
| i. | संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई ... | अध्यक्ष |
| ii. | संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई ... | सदस्य |
| iii. | संचालक, वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालये, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई ... | सदस्य |
| iv. | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर ... | सदस्य |
| v. | अधिष्ठाता, ग्रँन्ट वैद्यकीय महाविद्यालय तथा ज.जी. समूह रुग्णालये, मुंबई ... | सदस्य |

(ब) वैद्यकीय पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांना बंधपत्रित सेवेत नियुक्ती देण्याकरीता मध्यवर्ती समिती

| | | |
|---|---|---|
| i. | संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई ... | अध्यक्ष |
| ii. | संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई ... | सदस्य |
| iii. | संचालक, वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालये, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई ... | सदस्य |
| iv. | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद ... | सदस्य |
| v. | अधिष्ठाता, बै.जी. वैद्यकीय महाविद्यालय तथा ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे ... | सदस्य |

२. वरील दोन्ही समित्या बंधपत्रित उमेदवारांना बंधपत्रित सेवेत नियुक्त्या देण्याकरीता पुढील कार्यपध्दतीचा अवलंब करतील.

i. पदवी, पदव्युत्तर व अतिविशेषोपचार अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या व बंधपत्रित सेवेस पात्र असणाऱ्या उमेदवारांच्या गुणवत्ता याद्या तयार करुन वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

ii. पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी त्यांनी सदर अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाच्या परीक्षेत प्राप्त केलेले एकूण गुण आधार मानण्यात येतील. पदव्युत्तर व अतिविशेषोपचार अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी त्यांनी सदर अभ्यासक्रमाच्या अंतिम परीक्षेत प्राप्त केलेले एकूण गुण आधार मानण्यात येतील.

vii. वरील प्रक्रियेद्वारे नियुक्ती देण्यात आलेला उमेदवार त्याच्या नियुक्तीच्या ठिकाणी विहीत मुदतीत रुजू न झाल्यास वा सदर उमेदवाराने रुजू होऊन बंधपत्रित सेवा खंडीत केल्यास, सदर उमेदवाराने बंधपत्राचा भंग केला असे समजून योग्य ती पुढील कार्यवाही एकतर्फी करण्यात येईल. तथापि, यास खालील प्रकरणी अपवाद करण्यात येईल.

I. जर एखाद्या महिला उमेदवाराची बंधपत्रित सेवा गर्भधारणेमुळे खंडीत झाली असेल तर अशा महिला उमेदवारास पुढील नियुक्ती प्रक्रियेत नियमित उमेदवाराप्रमाणेच नव्याने अर्ज सादर करावा लागेल व नियुक्ती मिळाल्यास सदर उमेदवाराने बंधपत्रित सेवेस नव्याने प्रारंभ केला असे समजण्यात येईल.

II. एखाद्या उमेदवाराची बंधपत्रित सेवेच्या व्याख्येत मोडणाऱ्या अन्य स्थायी सेवेत नियुक्ती झाल्यास सदर उमेदवाराची बंधपत्रित सेवा सदर उमेदवार उक्त स्थायी सेवेत रुजू झाल्यापासून नव्याने प्रारंभ झाली असे समजण्यात येईल.

३. वरील नियुक्ती प्रक्रिया राबवितांना मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या उपरोल्लेखित अंतरिम आदेशातील पुढील अटींचे काटेकोरपणे अनुपालन करण्यात येईल.

i. अतिविशेषोपचार अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांचा शासकीय व महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयामध्ये सहायक प्राध्यापक किंवा सदर महाविद्यालयांना संलग्न रुग्णालयांमध्ये अगर अतिविशेषोपचार रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी या पदावर नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल. त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय वा प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी या पदावर नियुक्त करण्यात येणार नाही.

ii. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांची शक्यतोवर शासकीय व महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयामध्ये सहायक प्राध्यापक किंवा सदर महाविद्यालयांना संलग्न रुग्णालयामध्ये अगर अतिविशेषोपचार रुग्णालयांमध्ये तसेच पुरेशा पायाभूत सुविधा असलेल्या जिल्हा सामान्य रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी या पदावर नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल. त्यांना ग्रामीण रुग्णालय वा प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी या पदावर नियुक्त करण्यात येणार नाही.

iii. पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांचा शासकीय व महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयामध्ये सहायक प्राध्यापक किंवा सदर महाविद्यालयांना संलग्न रुग्णालयांमध्ये अगर अतिविशेषोपचार रुग्णालयांमध्ये वा जिल्हा सामान्य रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी या

iii. ज्या संस्थांची सेवा बंधपत्रित सेवेच्या व्याख्येत मोडते अशा संस्थांपैकी उक्त बंधपत्रित उमेदवारांना नियुक्ती देण्यास इच्छुक असणा-या संस्थांकडून त्यांच्याकडील सर्व निर्विवाद रिक्त पदांचा तपशील मार्गावण्यात येईल. त्याआधारे रिक्त पदांची संस्थानिहाय यादी तयार करुन वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

iv. त्यानंतर उक्त उमेदवारांकडून ते या शासन निर्णयाच्या परिच्छेद क्रमांक (३) मधील अटींनुसार ज्या संवर्गातील पदावर नियुक्तीसाठी पात्र आहेत, अशा पदांवर नियुक्तीसाठी ईमेलद्वारे विहीत नमुन्यात अर्ज व पसंतीक्रम मार्गावण्यात येतील. प्रत्येक उमेदवार जास्तीत १० पसंतीक्रम देऊ शकेल.

v. उमेदवारांची गुणवत्ता व त्यांनी दिलेल्या पसंतीक्रमांच्या आधारे उपलब्ध पदांवर त्यांच्या नियुक्त्या करण्यात येतील.

vi. प्रथम, सर्व अतिविशेषोपचार अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांच्या नियुक्त्या करण्यात येतील. त्यानंतर पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व शेवटी पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांच्या (या क्रमाने), या शासन निर्णयाच्या परिच्छेद क्रमांक (३) मधील अटींच्या अधीन राहून, नियुक्त्या करण्यात येतील.

vii. जे उमेदवार कोणताही पसंतीक्रम दर्शविणार नाहीत किंवा ज्या उमेदवारांना त्यांच्या पसंतीक्रमांनुसार नियुक्ती मिळू शकली नाही, त्यांना सक्षम समिती देईल ती नियुक्ती स्विकारणे बंधनकारक राहील.

viii. उक्त प्रक्रियेनुसार सर्व रिक्त पदे भरण्यात आल्यानंतर जे उमेदवार शिल्लक राहतील त्यांना पुढील नियुक्ती प्रक्रियेत नियमित उमेदवारांप्रमाणेच अर्ज सादर करावे लागतील.

ix. वरील नियुक्ती प्रक्रिया ही शासनाच्या बंधपत्रित सेवा योजनेंतर्गत राबविण्यात येत असल्यामुळे त्यास नियमित सेवा प्रवेशाचे अन्य नियम, जसे की आरक्षण, लागू राहणार नाहीत.

x. वरील कार्यपध्दतीनुसार करण्यात आलेल्या नियुक्त्यांमध्ये कोणतेही फेरबदल करण्यात येणार नाहीत. त्यासंदर्भात प्राप्त झालेले सर्व अर्ज परस्पर दप्तर-दाखल करण्यात येतील.

xi. सदर नियुक्त्या फक्त बंधपत्रित सेवेच्या कालावधी पुरत्याच करण्यात येतील. उक्त कालावधी पूर्ण झाल्यावर उमेदवारांचा त्यांच्या नियुक्तीच्या वा तत्सम पदावर कोणताही अधिकार राहणार नाही.

पदावर नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल. तथापि, तसे शक्य नसल्यास त्यांची ग्रामीण रुग्णालये वा प्राथमिक आरोग्य केंद्रामध्येही वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल.

iv. बंधपत्रित उमेदवारांची कोणत्याही प्रशासकीय पदावर नियुक्ती करता येणार नाही.

v. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या उपरोल्लेखित अंतरिम आदेशात स्पष्ट केल्यानुसार वैद्यकीय अधिकारी या संज्ञेच्या व्याख्येत रुग्णालयातील प्रबंधक, वरिष्ठ निवासी व ट्युटर यांचा समावेश होतो.

४. उपरोक्त कार्यपध्दतीनुसार नियुक्त करण्यात आलेले उमेदवार सेवेत रुजू झाल्यानंतर त्यांचे मूळ शैक्षणिक प्रमाणपत्र/ दस्तऐवज त्यांना तात्काळ परत करण्यात येतील.

५. हा शासन निर्णय तात्काळ अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( स्वप्नील गोपाल बोरसे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
शासनाचे अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई
आयुर्वेद संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कमांडिंग ऑफिसर, आय.एन.एच.एस. अश्विनी, कुलाबा, मुंबई ४०० ००५
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी